MHRG190010412023

:: भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ६७/२०२० मधील निशाणी क्र.१४ वरील आदेश ::

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदाराने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६, नियम १७ प्रमाणे अर्जात दुरुस्त करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली.

०२. अर्ज व सामनेवाला क्र.१ व २ यांनी निशाणी क्र.२५ वरील व सामनेवाला क्र.३ यांनी निशाणी क्र.१६ वरील दिलेले म्हणणे वाचले. अर्जदारतर्फे वकील श्री.बी.टी.नवाळे, सामनेवाला क्र.१ व २ तर्फे सहा.सरकारी वकील श्री.योगेश तेंडुलकर व सामनेवाला क्र.३ तर्फे सौ.वर्षा पाटील यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०३. अर्जदारचे कथन की, अर्जदारच्या मालकीची मौजे करंजाडी, ता.महाड, जि.रायगड येथील मिळकत शासनाने नागेश्वरी धरणाकरिता अल्प बाजारभावाने संपादित केली. परिणामी, भुसंपादन अधिनियम, २८–अ(३) अन्वये संपादित मिळकतीचे योग्य मुल्य निर्धारण करण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज दिला. संपादित मिळकतीकरिता रु.१,०००/– प्रति चौरस मीटरने मागणी करुन आवश्यक तो स्टॅम्प दयावा लागणार असल्याचे मुळ अर्ज परिच्छेद क्र.९ मध्ये नमुद केलेले आहे. परंतु, मुळ रेफरन्स अर्ज दाखल करतेवेळी अर्जदाराची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याने त्याने संपादित जमीनीची उक्त किंमत/मुल्य रु. १,०००/– धरुन त्यावर रु. १००/– न्यायालयीन मुद्रांक दिल्याचे रेफरन्स अर्ज

परिच्छेद क्र.९ मध्ये स्पष्ट केले आहे. मुळ रेफरन्स अर्जाच्या परिच्छेद क्र.९ मधील परिच्छेदात "वर परिच्छेद नं.९ मध्ये म्हटल्याप्रमाणे................. बाजारभाव मागण्याचा अधिकार आम्ही याव्दारे राखुन ठेवित आहोत.'' सदरचा मजकुर हा अतिरिक्त असल्याने सदर मजकुर वगळण्याकामी प्रस्तुतचा रेफरन्स दुरुस्ती अर्ज अर्जदारास दाखल करणे भाग पडले.

०४. अर्जदारचे पुढे कथन की, रेफरन्सची अदयाप सुनावणी सुरु झालेली नाही. मागणीप्रमाणे रेफरन्स अर्जातील अतिरिक्त मजकुर वगळण्याची तथा रेफरन्स अर्ज दुरुस्ती करण्याची परवानगी दिल्यास सामनेवाल्यावर कोणताही अन्याय होणार नाही अथवा त्याच्या बचावास कोणतीही बाधा निर्माण होणार नाही. सबब, न्यायहितास्तव अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

०५. याउलट सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी सदर अर्जास आक्षेप नोंदवुन सदर अर्जास योग्य व संयुक्तीक कारण नसुन अर्ज मुदतबाहय आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे मुळ रेफरन्स अर्जात अमुलाग्र बदल होवुन त्यांचे बचावावर विपरित परिणाम होणार आहे. परिणामी, अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

०६. उभयपक्षातर्फे करण्यात आलेल्या परस्पर विरोधी युक्तिवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तावित दुरुस्तीद्वारे अर्जदार हे अर्जात नमुद केल्याप्रमाणे अतिरिक्त मजकुर वगळु पाहत आहे. अर्जातील मजकुर व प्रार्थना तसेच सामनेवाला यांनी कैफियतीमध्ये घेतलेला बचाव लक्षात घेता, सदरचा अतिरिक्त मजकुर अर्जदारास प्रस्तावित दुरुस्तीने वगळण्याची परवानगी दिल्यास सामनेवाल्याच्या बचावावर कोणताही परिणाम होणार नसल्याचे दिसुन येते. प्रस्तावित दुरुस्तीमुळे मुळ रेफरन्स अर्जाच्या स्वरुपात तथा प्रार्थनेमध्ये कोणताही

बदल होणार नाही. प्रकरणामध्ये अद्याप उभयपक्षांतर्फे पुरावा नोंदविणे चालु झालेले नाही. परिणामी, प्रकरणाचा टप्पा लक्षात घेता, प्रस्तावित दुरुस्तीला कायदेशीर प्रक्रियेची बाधा येत नाही. प्रस्तावित दुरुस्तीची अर्जदारास परवानगी दिल्यास सामनेवाल्याचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**:: <u>आदेश</u> ::**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदारने पुढील तारखेपर्यत मागणीप्रमाणे अर्जात दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करण्याचे आदेशित करण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2025.09.11 17:46:12 +0530

महाड, (**श्रीमती एच. आर. जाधव**)
दिनांकः११.०९.२०२५ दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड